**Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | **Time:**3 hrs

**Date:** 21-02-2025 | **Paper:** PreBoard 2 | **Marks:**80

**(विभाग - १ : गद्य)**

**1(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(7)**

(1) (1) कृती पूर्ण करा : (1)

(i) लेखकाच्या काळजाला भिडलेले दृश्य - ................................ .

(ii) लाजेने खाली घातलेली मान कधी अभिमानाने वर झाली - ................................ .

(2) क्रिकेट खेळत असल्याबद्दल लेखकाला धन्य धन्य का वाटले ? (1)

माझ्या काही मित्रांसहित झाडावर बसून मी दिवसभर मॅच पाहात होतो आणि अजूनही वाटते, की पुन्हा एकदा तसेच झाडावर चढावे आणि तिथूनच मनसोक्त मॅच पाहावी. मी आणि माझे मित्र मॅचचे वर्णन आमच्या बुद्धीप्रमाणे जोरजोरात हातवारे करून इतरांना ऐकवत असू, दिवसाचा खेळ झाल्यावर कोणी झेल कसा घेतला-कसा सोडला, दांडी कशी उडाली, चौकार कसा मारला याची रसभरित चर्चा करतच आम्ही चालत चालत घरी परतत असू. ही मॅच पाहिल्यावर तिचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. विशेषत: मॅच संपल्यावर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी जी झिम्मड उडते, तेव्हाचे ते दृश्य काळजात भिडले. काही खेळाडू आनंदाने स्वाक्षरी देत होते, तर काही नाकारत होते. हा सर्व सोहळा पाहून मनात आले, की आपणही एक मोठे खेळाडू व्हावे. मग आपल्या भोवतीही अशीच स्वाक्षरीसाठी गर्दी होईल. बस्, तेव्हा पासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरुवात झाली!

विशेष म्हणजे वर्गात गणिताच्या तासाला वहीची अनेक पाने माझ्या स्वाक्षरीने भरू लागली. जर चुकूनमाकून शिक्षकांचे माझ्याकडे लक्ष गेलेच व मला प्रश्न विचारलाच तर न कळत माझ्या तोंडातून, 'हाऊज दॅट?' असे उत्तर बाहेर पडे! हे उद्गार ऐकून वर्गात एकच हशा होई आणि माझी मान लाजेने खाली होई; पण हीच लाजेने खाली घातलेली मान मी जेव्हा थोड्याच दिवसांनी आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या , तेव्हा सर्वांच्या डोळ्यांतील कौतुकांचे भाव पाहाण्यासाठी अभिमानानेवर झाली. माझे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि त्याच वेळी प्रथम मला क्रिकेट खेळत असल्याबद्दल धन्य-धन्य वाटले. माझ्या मनात क्रिकेटचे बीज पेरले गेले आणि उगवले ते असे.

TickMark.Ai

(2) एका वाक्यात उत्तरे द्या : (2)

(i) लेखकाची वही कोणत्या तासाला स्वाक्षरीने भरू लागली ?

(ii) लेखकाला शिक्षकांनी प्रश्न विचारल्यास लेखकाचे उत्तर काय असे ?

(iii) लेखकाची मॅच पाहायला बसायची जागा कोणती होती ?

(iv) कोणत्या सामन्यात लेखकाने १०० धावा केल्या ?"

(3) तुमच्या मते लेखकाच्या मनात पेरले गेलेले क्रिकेटचे बीज कसे उगवले ते लिहा. (3)

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(7)**

(1) आकृती पूर्ण करा : (2)

रेखामावशींची कामे

(1) ..................

(2) ..................

अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या. आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता. काल त्यांच्याकडे सुमित आला होता कानपूरहून सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ. तो आय. आय. टी. कानपूरला शिकत होता. काल संध्याकाळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्यानं केलेले नवे प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन वाजले. "काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता ?" हॉलमधून स्नेहलचा आवाज आला. अभिषेक हॉलमध्ये आला तर रेखामावशी फरशी पुसत होत्या; पण मागे त्यांच्या पायाचे काळे मळकट ठसे पुसलेल्या फरशीवर उमटले होते. स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती. रेखामावशीही बिचाऱ्या वरमल्या होत्या.

"अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायानी. आन धा धा मिनटाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ ?" "सॉरी, मावशी खरंच सॉरी," आपण त्यांच्या मळकट पायाबद्दल बोललो याचं स्नेहललाह कसंतरी वाटलं.

(2) चौकटी पूर्ण करा : (2)

(i) दार उघडणारा - ...................
(ii) फरशी पुसणाऱ्या - ...................
(iii) अभिषेकचा आतेभाऊ - ...................
(iv) स्वच्छतेची भोक्ती - ...................


(3) स्वमत: (3)

'सर्वांनी आठवड्यातून एकदातरी सायकलचाच वापर करावा' या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

**(अपठित गद्य)**

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(4)**

(1) आकृती पूर्ण करा : (2)




आनंदवनामध्ये बाबांनी कुष्ठरोग्यांना स्वाभिमानाने जगायला शिकवले, राहण्यासाठी झोपड्या बांधणे. अन्नधान्यासाठी शेती करणे यापासून अनेक पूरक उद्योग त्यांनी सुरू केले. अर्थात् ही प्रक्रिया सोपी नव्हती अनेक अडचणी होत्या. पण त्यावर मात करत बाबांनी भंगलेल्या शरीरांना, खचलेल्या मनांना जगण्याची उभारी दिली. ताठ मनाने जगण्याची प्रेरणा | दिली. आनंदवनात बाबांनी कुष्ठरोग्यांवर उपचार केले, त्यांना निवास उपलब्ध करून दिला. शिवाय त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी साधने उपलब्ध करून दिली त्यामुळे त्यांना कष्टाची भाकरी मिळवता आली. त्यांच्या कलागुणांना वाव दिला त्यामुळे दैवाने मोडतोड केलेल्या चेहऱ्यांवर हास्य उमलले. हे हास्य समाधानाचे, आत्मविश्वासाचे होते.

बोटं झडलेल्या थिट्या हातांना कामाची सवय लागावी आणि स्वाभिमानाचा ताठ कणा लाभावा यासाठी '

आनंदवनाची धडपड असते. आनंदवन उभारताना बाबांनी आतोनात कष्ट घेतले त्यामुळेच गेली सहा दशके तिथे महारोगाने, अंधत्वाने अपंगत्वाने झाकोळून गेलेली जीवने उजळून निघाली. जन्माला येतानाच उपेक्षा घेऊन आलेल्या जिवांमध्ये 'सुंदर मी होणार' यासोबत 'सुंदर मी करणार' हा मंत्र आनंदवनने जोपासला.

(2) योग्य जोड्या लावा : (2)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) भंगलेली | (i) भाकर |
| (ii) खचलेली | (ii) जीवने |
| (iii) कष्टाने मिळवलेली | (iii) मने |
| (iv) झाकोळलेल | (iv) शरीरे |

TickMark.Ai

**(विभाग - २ : पद्य)**

**2(अ) कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **(8)**

(1) खालील कृती केव्हा घडतात, ते लिहा : (2)

(i) माता धावून जाते .................
(ii) धरणीवर पक्षिणी झेपावते .................
(iii) गाय हंबरत धावते .................
(iv) हरिणी चिंतित होते .................

अग्निमाज पडे बाळू।
माता धांवें कनवाळू॥ १ ॥

तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा॥ २ ॥

सर्वोचि पावें पक्षिणी।

पिलीं पडतांचि धरणीं॥ ३ ॥

भुकेलें वत्सरावें।
धेनु हुंबरत धांवे॥ ४ ॥

वणवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी॥ ५ ॥

नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा॥ ६ ॥

(2) कोण ते लिहा : (2)

(i) परमे वर कृपेची याचना करणारे – .................
(ii) मेघाची विनवणी करणारा – .................
(iii) भुकेलेले – .................
(iv) भक्ताच्या हाकेला धावून येणारा – .................

(3) आई, प्राणी, पक्षी यांच्या मातृप्रेमाचे कवितेतून व्यक्त झालेले वर्णन तुमच्या शब्दांत लिहा. (2)

(4) तैसा धांवें माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ॥ या ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.' (2)

**(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुदद्यांच्या आधारे कृती सोडवा : (8)**

(1) योगी सर्वकाळ सुखदाता'

१. प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री : (०१ गुण)
२. प्रस्तुत कवितेचा विषय : (०१ गुण)
३. प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहिणे (०२ गुण)
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।
४. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)
५. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण (०२ गुण)

(2) अंकिला मी दास तुझा कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (०१ गुण)
२) कवितेचा विषय (०१ गुण)
३) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (०२ गुण)
४) कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)
५) दिलेल्या ओळींचा अर्थ लिहा. (०२ गुण)
अग्निमाजि पडे बाळू |
माता धावें कनवाळू ||२||

**(विभाग - ३ : स्थूलवाचन)**

**3) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (6)**

(1) टीपा लिहा.
डॉ. होमी भाभा

(2) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.

(3) पाणी हेच जीवन !' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

**(विभाग - ४ : भाषाभ्यास)**

**4(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती : (8)**

**(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा : (2)**

(1) तुम्हाला काही मदत हवी आहे का ?

(2) किती सुंदर आहे ताजमहाल !

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्य रुपांतर करा : (2)**

(1) सर्वांनी रांगेत उभे राहावे. (आज्ञार्थी करा)

TickMark.Ai

(2) मला हे चित्र नापसंत नाही (होकारार्थी करा)

**(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (फक्त दोन) :** **(4)**

(1) वाव नसणे

(2) गलका करणे

(3) कष्टी होणे

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

**(1) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :** **(1)**

(i) अंगण -

(ii) अंगार -

**(2) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **(1)**

(i) खंडन x

(ii) खात्री x

**(3) वचन बदला :** **(1)**

(i) पुरस्कार -

(ii) गाव -

**(4)** **(1)**

(1) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा (1)

खूप वय असणारा -

**(2) खालील कृती सोडवा :** **(2)**

(1) अचूक शब्द ओळखा (1)

तत्वता, तत्वत्वां, तत्त्वता, तत्व्हता

(2) खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा (1)

निर्सग हा मोठा जादुगार आहे

**(3) विरामचिन्हे :** **(2)**

(1) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करुन वाक्ये पुन्हा लिहा (1)

आता ह्या उड्या मारायला मी लाजदेखील सोडली हे पाहता ना तुम्ही बाबा

(2) खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखून लिहा (1)

| चिन्ह | नांव |
|---|---|
| ! | ............... |
| ' ' | ............... |

**(विभाग - ५ : उपयोजित लेखन)**

**5(अ) खालील कृती सोडवा :** **(6)**

**(1) पत्रलेखन :**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणती ही एक कृती सोडवा.

TickMark.Ai

दादर येथील 'सरस्वती विद्या निकेतन' येथील शाळेजवळील साने गुरुजींची मार्गवराच्या अपघातात लक्षणीय वाढ

गेल्या सहा महिन्यात १० विद्यार्थ्यांना अपघातामुळे दुखापत

बेफाम वाहनचालकांमुळे अपघात

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने पत्र लिहा

शाळेसमोरील मार्गवर विद्यार्थ्यांकरिता पादचारी पूल बांधण्याची विनंती करणारे पत्र लिहा.

किंवा

नव्या पादचारी पुलावर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.

**किंवा**

**(2) सारांशलेखन :**
**विभाग 1 गद्य (इ) (प्र. क्र. 1- इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**
**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **(10)**
**(1) जाहिरात लेखन :**

TickMark.Ai

खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.

चला करूया भ्रमंती
फुलपाखरांच्या जगात
नाव नोंदणी आवश्यक त्वरा करा !

त्वरा करा ! त्वरा करा !
मोजक्याच जागा शिल्लक
राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती !
घेऊया फुलपाखरांच्या विश्वाचा रोमहर्षक अनुभव

वयोगट : 10 ते 15, नोंदणी शुल्क - रु.200/-
कालावधी : 25 डिसेंबर ते 27 डिसेंबर
संपर्क : जंगल भ्रमंती संस्था, तापोळा
(आयोजक)

कृती करा :

(1) जंगल भ्रमंतीसाठी नोंदणी शुल्क - ......................................... .
(2) उद्यानात भ्रमंती करण्यासाठी वयोगट - ......................................... .
(3) उद्यानात फिरण्याचा कालावधी - ......................................... .
(4) जंगल भ्रमंतीचे ठिकाण - ......................................... .
(5) आयोजक संस्थेचे नाव - ......................................... .

**(2) बातमी लेखन :**

खालील निवेदन वाचून बातमी तयार करा:
गांधी जयंतीचे औचित्य साधत शहरातील सर्व शाळांत २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

**(3) कथालेखन :**

पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा आणि तिला शीर्षक द्या : (शब्दमर्यादा 80 ते 100)

लोभी माणूस -- तपश्चर्या -- परमेश्वर प्रसन्न -- वरदान -- सूर्य मावळेपर्यंत पळून परत येशील तितकी जमीन तुझी -- पळतच राहतो -- सूर्यास्त होतो -- शेवटी थकून मरुन पडतो -- अतिलोभाचे फळ.

**(इ) लेखनकोशल्य : खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(8)**

**(1) प्रसंगलेखन :**

शालेय प्रजासत्ताक दिन
→ पूर्वतयारी
→ मनोगते
→ सांस्कृतिक कार्यक्रम
→ ध्वजारोहण

वरील कार्यक्रमास तुम्ही विद्यार्थी म्हणून उपस्थित होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(2) आत्माकथन :**

वरील घटक तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करा व त्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.




**(3) वैचारिक :**

'युग संगणकाचे' या विषयावर खालील मुद्दयांच्या आधारे तुमचे विचार लिहा. काळाची गरज- महत्त्व- फायदे/तोटे-सदुपयोग वरील घटक तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करा व त्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.

**All the Best**

TickMark.Ai